दैनिक लोकशाही
मुंबई
महानगर next
६
मुंबई, गुरुवार, दि.१७ सप्टेंबर २०२६
epaper.lokshahilive.com

## मराठी शिकावीच लागेल : भुजबळ

**मुंबई :** मनोज जरांगे यांच्या मागणीनुसार जात पडताळणी समित्या रद्द केल्यास कुणीही आदिवासी किंवा अनुसूचित जातीचे प्रमाणपत्र घेऊन आरक्षित प्रवर्गात प्रवेश करू शकतो, अशी भीती अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी व्यक्त केली. ते प्रसारमाध्यमांशी बोलत होते.

अनेकवेळा चुकीची प्रमाणपत्रे काढून लोकांनी नोकऱ्या लाटल्या आहेत. यावरून सर्वोच्च न्यायालयानेही फटकारले आहे. त्यामुळे जात पडताळणी समित्या महत्त्वाच्या आहेत. मुंबईत राहात असेल तर अमराठी रहिवाशांना कामापुरती मराठी शिकावीच लागेल, अशा शब्दांत भुजबळ यांनी मराठी शिकण्यास नकार देणाऱ्यांना समज दिली. महाराष्ट्रातील वाहनचालकांसाठी मराठी भाषा शिकण्याच्या नियमावरून सुरू असलेल्या चर्चेच्या पार्श्वभूमीवर त्यांनी या नियमाचे समर्थन केले.

## महत्वाचे

### लालबागच्या राजाच्या दर्शनासाठी तासन्तास रांग

**मुंबई :** लालबागच्या राजाच्या दर्शनासाठी मुंबईत गणेशभक्तांची मोठी गर्दी उसळली आहे. अनेक भाविक तासन्तास रांगेत उभे राहून आपल्या लाडक्या बाप्पाच्या दर्शनाची प्रतीक्षा करत आहेत. मात्र, दर्शनाच्या ठिकाणी गर्दी नियंत्रणादरम्यान भाविकांना धक्काबुक्की होत असल्याचे दृश्य समोर आले आहे. या घटनेचा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर चर्चेत आहे.लालबागच्या राजाच्या दर्शनासाठी मोठ्या संख्येने भाविक दाखल झाले आहेत. गर्दी वाढल्याने दर्शनाच्या मार्गावर मोठी कोंडी निर्माण होत आहे. याचदरम्यान समोर आलेल्या व्हिडीओमध्ये पोलिस कर्मचारी गर्दीत अडकलेल्या भाविकांना पुढे जाण्यासाठी ढकलताना दिसत आहेत. काही भाविकांना अक्षरशः हाताने बाजूला करत बाहेरच्या दिशेने हलवले जात असल्याचे दृश्य व्हिडीओत कैद झाले आहे. दूरवरून लालबागच्या राजाच्या दर्शनासाठी आलेले भाविक अनेक तास रांगेत उभे राहत आहेत.

### उमर अपार्टमेंटच्या पार्किंगला भीषण आग

**भिवंडी :** बुधवारी पहाटे भिवंडीच्या खंडुपडा परिसरातील उमर अपार्टमेंटच्या तळघरातील पार्किंगमध्ये एका भीषण आगीची दुर्दैवी घटना घडली. या आगीत तब्बल १४ दुचाकी जळून खाक झाल्या असून, इमारतीमध्ये धूर पसरल्याने रहिवाशांमध्ये एकच तारांबळ उडाली आणि सुरक्षेसाठी त्यांना इमारतीच्या गच्चीवर धाव घ्यावी लागली. घटनास्थळावरून मिळालेल्या माहितीनुसार, ही आग पहाटे पावणेचार ते चारच्या दरम्यान लागली. आगीच्या तीव्र ज्वाळांनी संपूर्ण पार्किंग परिसर वेढला होता. आग नियंत्रणात आल्यानंतर पाहणी केली असता, १४ दुचाकी पूर्णपणे जळून खाक झाल्याचे निष्पन्न झाले.

### ऐन गणेशोत्सवात ठाणेकरांची वाहतूक कोंडी वाढली

**ठाणे:** ठाणेकरांच्या दृष्टीने महत्त्वाची बातमी आहे. ऐन गणेशोत्सवाच्या दिवसांमध्ये ठाणेकरांना आणखीन वाहतूक कोंडीची समस्या उद्भवण्याची शक्यता आहे. अनिश्चित काळासाठी कासारवडवली ओव्हर ब्रिज ठेवण्यात येणार आहे. ममर्द कडून ब्रिजच्या तपासणीचे काम हाती घेण्यात येणार आहे. त्यामुळे आज रात्रीपासून अनिश्चित काळापर्यंत ठाणेकरांना पर्यायी मार्गाने वाहतूक करावी लागणार आहे. कासरवडवली वाहतूक उपविभागाच्या हद्दीमध्ये हे महत्त्वाचे काम हाती घेण्यात येणार आहे.कासारवडवली वाहतूक उपविभागाच्या हददीत, कडून कासारवडवली ओव्हर ब्रिजचे तपासणीचे काम करण्यात येणार आहे. कासारवडवली ओव्हर ब्रिज हा सर्व प्रकारच्या वाहनांकरिता दिनांक १५/०९/२०२६ पासून अर्थात आजपासून मध्यरात्री १२ वाजल्यापासून ओव्हर ब्रिजचे तपासणीचे काम पूर्ण होईपर्यंत पूर्णपणे बंद करून सर्व प्रकारची वाहतूक ही स्लिप रोड मार्गे वळविण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली आहे.

# सोन्या-चांदीच्या दरात पुन्हा तेजी!

## चांदी तब्बल ३ हजारांनी महागली : सण-उत्सवात महागाईचा ताण

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**मुंबई** ✍ प्रतिनिधी

दोन दिवसांच्या घसरणीनंतर आज सोन्या-चांदीच्या दरात पुन्हा तेजी पाहायला मिळत आहे. आज सोन्याच्या दरात ९७६ रुपयांची वाढ झाली असून, सोन्याचा भाव १,५१,७८५ रुपये प्रति १० ग्रॅमवर पोहोचला आहे. दुसरीकडे, चांदीच्या दरात तब्बल ३,०८२ रुपयांची वाढ झाली असून, चांदी २,३५,२०० रुपये प्रति किलोग्रॅमवर व्यवहार करत आहे.

आंतरराष्ट्रीय बाजारातही मौल्यवान धातूंच्या दरात वाढ झाली आहे. कॉमेक्सवर सोन्याच्या किमतीत ०.८८ टक्क्यांची वाढ झाली असून, सोन्याचा भाव सुमारे ४,३७० डॉलर प्रति औंसवर व्यवहार करत आहे. तर चांदीच्या किमतीत १.९६ टयांची वाढ झाली असून, चांदी सुमारे ६५ डॉलर प्रति औंसवर पोहोचली आहे. त्यामुळे आज सोने किंवा चांदी खरेदी करण्याचा विचार करत असाल, तर



खरेदीपूर्वी तुमच्या शहरातील २२ कॅरेट, २४ कॅरेट आणि १८ कॅरेट सोन्याचे दर जाणून घेणे महत्त्वाचे आहे. १६ सप्टेंबर रोजी सराफा बाजारातील दरांनुसार, नवी दिल्लीत २४ कॅरेट सोन्याचा भाव सुमारे १,५१,७९० रुपये प्रति १० ग्रॅम, तर २२ कॅरेट सोन्याचा भाव १,३९,१४१ रुपये प्रति १० ग्रॅम आहे. मुंबईत २४ कॅरेट सोन्याचा दर सुमारे १,५२,०५० रुपये प्रति १० ग्रॅम, तर २२ कॅरेट सोन्याचा भाव १,३९,३७९ रुपये प्रति १० ग्रॅम आहे. पुण्यात २४ कॅरेट सोन्याचा दर सुमारे १,५२,०५० रुपये प्रति १० ग्रॅम, तर २२ कॅरेट सोन्याचा भाव १,३९,३७९ रुपये प्रति १० ग्रॅम आहे. शहरानुसार सोन्याच्या दरात काही प्रमाणात फरक दिसून येत आहे. स्थानिक कर, मेकिंग चार्ज आणि इतर शुल्कांमुळे प्रत्यक्ष खरेदीच्या वेळी ग्राहकांना वेगळा दर लागू होऊ शकतो.

सोन्यासोबत चांदीच्या दरातही आज मोठी तेजी पाहायला मिळत आहे. उपलब्ध बाजारातील आकडेवारीनुसार, नवी दिल्लीत ९९९ फाइन सिल्व्हरचा भाव सुमारे २,३४,०७० रुपये प्रति किलो आहे. मुंबईत चांदीचा दर २,३४,४८० रुपये प्रति किलो, तर बंगळुरूमध्ये सुमारे २,३४,६६० रुपये प्रति किलो आहे. हैदराबादमध्ये चांदीचा भाव २,३४,८५० रुपये प्रति किलो, तर चेन्नईमध्ये तो सुमारे २,३५,१६० रुपये प्रति किलो आहे.

**सोन्या-चांदीच्या दरात तेजी का?**

गेल्या काही काळात सोने आणि चांदीच्या दरात मोठ्या प्रमाणात चढ-उतार पाहायला मिळत आहेत. जागतिक पातळीवरील आर्थिक आणि भू-राजकीय अनिश्चिततेमुळे गुंतवणूकदारांकडून सोन्याकडे सुरक्षित गुंतवणुकीचा पर्याय म्हणून पाहिले जात आहे. दुसरीकडे, औद्योगिक मागणी, गुंतवणूकदारांचा कल आणि चलन बाजारातील चढ-उतार यामुळे चांदीच्या दरावरही परिणाम होत आहे. मध्यपूर्वेतील तणावामुळेही मौल्यवान धातूंच्या बाजारात हालचाली वाढल्या आहेत. सप्टेंबरमध्ये चांदीच्या दरात काही प्रमाणात घसरण दिसून आली असली, तरी एकूणच चांदीचे भाव मागील पातळीच्या तुलनेत अजूनही जास्त आहेत.

**कच्च्या तेलाच्या दराचाही परिणाम**

मध्यपूर्वेतील तणावामुळे कच्च्या तेलाच्या किमतीत वाढ झाली आहे. त्यामुळे जागतिक महागाईबाबतची चिंता वाढली आहे. तेलाच्या दरात काही प्रमाणात घसरण झाली असली तरी क्रूड ऑइलचा भाव अजूनही सुमारे १०८ डॉलर प्रति बॅरलच्या आसपास आहे. महागाई वाढण्याची शक्यता आणि अमेरिकेतील व्याजदरांबाबतची अपेक्षा यामुळे सोन्या-चांदीच्या बाजारात पुढील काळातही मोठे चढ-उतार पाहायला मिळू शकतात.

# गोरेगाव चेकनाक्याजवळ बिबट्याचा वाढता वावर

## दूधसागर सोसायटीतील रहिवासी भीतीच्या छायेत : व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**मुंबई** ✍ प्रतिनिधी

गोरेगाव पूर्वेकडील चेकनाका परिसरातील दूधसागर सोसायटीच्या आसपास गेल्या आठवडाभरापासून बिबट्याचा वावर आढळून आल्याने परिसरातील रहिवाशांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. संजय गांधी राष्ट्रीय उद्यानालगतचा हा परिसर असून, रविवारी पहाटे बिबट्या आल्याचे येथील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाले. त्याचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे.

सायंकाळी अंधार पडल्यावर बिबट्या सोसायटीच्या आजूबाजूला फिरताना दिसतो. त्यामुळे आमचे रात्रीचे बाहेर पडणे मुश्किल झाले आहे. विशेषतः रात्रीच्या वेळी परिसरात



सामसूम असताना गेली आठ दिवस बिबट्याचा वावर अधिक जाणवत असल्याचे रहिवाशांनी सांगितले. त्यामुळे वन विभागाने बिबट्याच्या हालचालींवर लक्ष ठेवण्यासाठी ट्रॅप कॅमेरे बसवावेत आणि आवश्यक ती बंदोबस्ताची उपाययोजना करावी, अशी मागणी त्यांनी केली आहे. गेल्या आठवडाभरापासून बिबट्याचा वावर आढळून येत आहे.

बिबट्याचा ठावठिकाणा शोधण्यासाठी शनिवार-रविवारी वनविभागाने दूधसागर सोसायटीची पाहणी करून रेकी केली. त्याला जेरबंद करण्यासाठी येथे पिंजरे लावण्यात येतील असे रेंज फॉरेस्ट ऑफिसर संतोष डगले यांनी सांगितले. बिबट्याच्या हालचाली लक्षात घेता नागरिकांनी रात्री एकटे बाहेर पडू नये, तसेच घराबाहेर किंवा सोसायटी परिसरात कचरा टाकू नये, असे आवाहन केले आहे. बिबट्याला आकर्षित करणारे अन्नपदार्थ अथवा कचरा उघड्यावर राहणार नाही, याची काळजी घेण्याची गरज आहे. या परिसरात वन विभागाची गस्त वाढवा, पिंजरे लावून बिबट्याला जेरबंद करा, अशी विनंती आपण राज्याचे वनमंत्री गणेश नाईक यांना केली आहे, असे सोसायटीतील रहिवासी व कांदिवली पूर्वचे भाजप आ. अतुल भातखळकर यांनी सांगितले.

## प्रस्तावित १२ डब्यांच्या होम प्लॅटफॉर्ममुळे 'डबल डिस्चार्ज'ची सुविधा

# अंधेरीत लोकलमधून उतरा अन् थेट पूर्वेकडे बाहेर पडा!

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**मुंबई** ✍ प्रतिनिधी

अंधेरी स्थानकात लोकलमधून उतरल्यानंतर प्रवाशांना आता थेट अंधेरी पूर्वेकडे बाहेर पडण्याचा मार्ग मिळण्याची शक्यता आहे. पश्चिम रेल्वेने सहाव्या मार्गालगत उत्तर बाजूस १२ डब्यांचा होम प्लॅटफॉर्म उभारण्याचा प्रस्ताव तयार केला आहे. या सुविधेमुळे प्लॅटफॉर्म क्रमांक ९ वर येणाऱ्या लोकलमधील प्रवाशांना 'डबल डिस्चार्ज'ची सुविधा म्हणजेच दोन्ही बाजूंनी उतरता येणार आहे. साहजिकच पादचारी पुलांवर (एफओबी) होणारी गर्दी कमी होणार आहे.

प्रस्तावित १२ डब्यांच्या होम प्लॅटफॉर्ममुळे प्लॅटफॉर्म क्रमांक ९ वर येणाऱ्या ट्रेनमधील प्रवाशांना ट्रेनच्या दोन्ही बाजूंनी उतरता येईल. पूर्वेकडे जाणाऱ्या प्रवाशांना थेट अंधेरी पूर्वेकडील



रस्त्याच्या दिशेने जाता येणार आहे. त्यामुळे सध्याच्या एफओबी व जिन्यांवरील प्रवाशांचा भार कमी होईल. अंधेरी स्थानकात प्लॅटफॉर्म क्रमांक ४ आणि ५ दक्षिणेकडे वाढविण्याचे काम सुरू आहे. यामुळे प्लॅटफॉर्म क्रमांक ५ वरून विरारच्या दिशेने ट्रेन उलटविणे शक्य होणार आहे. प्लॅटफॉर्म क्रमांक ६ दक्षिणेकडे २० मीटर, तर प्लॅटफॉर्म क्रमांक ७ उत्तरेकडे १० मीटर वाढविण्याचे कामही सुरू आहे. यासोबत एस-४९ सिग्नल दक्षिणेकडे हलविण्यात येणार आहे.

# बेस्ट बस कारला घासून मेट्रो खांबावर आदळली!

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**मुंबई** ✍ वृत्तसंस्था

दिंडोशी आगारातील बेस्ट बसचा ओबेरॉय मॉल सिग्नलजवळ अपघात होऊन दोन जण जखमी झाल्याची घटना सोमवारी सायंकाळी घडली. जखमींवर जोगेश्वरी पूर्वेकडील ट्रॉमा केअर रुग्णालयात उपचार करण्यात आले. उपचारानंतर दोघांनाही रुग्णालयातून घरी सोडण्यात आले. दिंडोशी आगारातून भाईंदर स्थानक पूर्व येथे जाणारी मार्ग क्रमांक ७०५/३६ बस सायंकाळी ५ वाजण्याच्या सुमारास ओबेरॉय मॉलसमोरील उड्डाणपुलाखालील सिग्नलजवळ आली. सिग्नलवर बस उजवीकडे वळत असताना तिचा मागील उजवा भाग एका खासगी कारला घासला. त्यानंतर बस मेट्रो रेल्वेच्या खांबावर जाऊन आदळली. या अपघातात बेस्टचे कर्मचारी राजेंद्र सोनावणे (५८) आणि प्रवासी मंगेश मोडळेकर (५७) जखमी झाले.

सोनावणे यांच्या डोक्याला दुखापत झाली असून त्यांना तीन टाके घालण्यात आले. तर, मोडळेकर यांच्या हनुवटीला आणि डोक्याला दुखापत झाली असून हनुवटीला एक आणि डोक्याला पाच टाके घालण्यात आले. अपघातानंतर दिंडोशी आगाराचे अपघात निरीक्षक कुलकर्णी यांनी दोन्ही जखमींना तातडीने जोगेश्वरी येथील ट्रॉमा केअर रुग्णालयात दाखल केले. अपघात विभागाचे विशेष निरीक्षक नवले यांनीही घटनास्थळी मदत केली.

## ऑगस्ट संपला : पालिकेचा ५२ कोटींचा निधी मंजूर

# विद्यार्थ्यांना मोफत गणवेश, वह्या मिळेना!

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**मुंबई** ✍ प्रतिनिधी

मुंबई महापालिकेच्या शिक्षण विभागाने मोफत गणवेश आणि वह्यांसाठी कोट्यवधी रुपयांचा निधी मंजूर केला असतानाही, शैक्षणिक वर्ष सुरू होऊन तीन महिने उलटले, तरीसुद्धा विद्यार्थ्यांना अद्यापही या साहित्याचे वाटप करण्यात आलेले नाही.

मंजूर झालेला कोट्यवधींचा निधी कागदावरच अडकल्याने गरीब आणि सामान्य कुटुंबांतील पालकांना स्वतःच्या खिशातून पैसे खर्च करून खुल्या बाजारातून युनिफॉर्म व साहित्याची खरेदी करावी लागत आहे. महापालिकेच्या या गंभीर प्रशासकीय दिरंगाईविरोधात काँग्रेसने आक्रमक भूमिका घेत तीव्र विरोध दर्शवला आहे. महापालिकेने विद्यार्थ्यांच्या मोफत युनिफॉर्मसाठी रुपये १२१.७४ कोटी आणि वह्या/नोटबुकसाठी रुपये २९.५९ कोटी असा एकूण १५१.३३ कोटींचा निधी जून २०२६ मध्येच मंजूर केला होता. कंत्राटदारांमार्फत



हे साहित्य वेळेत विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचणे अपेक्षित होते. मात्र, सुमारे ३.१० लाख महापालिका विद्यार्थ्यांपर्यंत हे साहित्य अद्याप पोहोचलेले नाही. या प्रकरणी उच्च न्यायालयाच्या विविध निर्णयांचा दाखला देत काँग्रेस नगरसेविका डॉ. अजंता यादव यांनी प्रशासनाला धारेवर धरले. कंचन इंडिया लि. विरुद्ध महाराष्ट्र शासन आणि ओम एज्युकेशन सोसायटी विरुद्ध महाराष्ट्र शासन या प्रकरणांत मुंबई उच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे की, शासकीय शाळांतील विद्यार्थ्यांना मोफत गणवेश व शैक्षणिक सुविधा वेळेत देणे हे प्रशासनाचे कायदेशीर कर्तव्य आहे.

# पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांना मिळणार मोफत दप्तर

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**मुंबई** ✍ वृत्तसंस्था

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना दिलासा देणारा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. या निर्णयानुसार आता राज्यातील पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांना मोफत शालेय दप्तर दिले जाणार असून, यासाठी १७४ कोटी १९ लाख ३५ हजार ४२४ रुपयांच्या प्रस्तावाला प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. राज्यातील जिल्हा परिषद, महापालिका, नगरपालिका आणि इतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना विविध शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून देण्याच्या उपक्रमांतर्गत हा निर्णय घेण्यात आला आहे.

इयत्ता पहिली ते पाचवी आणि इयत्ता सहावी ते आठवी अशा दोन गटांतील विद्यार्थ्यांची संख्या विचारात घेऊन ही दप्तरे पुरवली जाणार आहेत. या दप्तरांची खरेदी ई-निविदा प्रक्रियेद्वारे पारदर्शक पद्धतीने केली जाणार असून, यासाठी प्राथमिक शिक्षण संचालनालयाकडून निविदेचे प्रारूप तयार केले जाणार आहे. शालेय साहित्याचा खर्च हा अनेकदा आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील पालकांसाठी अतिरिक्त आर्थिक भार ठरतो. त्यामुळे मोफत दप्तर उपलब्ध झाल्याने पालकांवरील हा भार काही प्रमाणात हलका होणार असून, विद्यार्थ्यांची शाळेतील उपस्थिती आणि शैक्षणिक सातत्य टिकवून ठेवण्यास मदत होईल.

# शौर्य पुरस्कार विजेते आणि कुटुंबीयांना मोफत रेल्वे प्रवास

## केंद्र सरकारचा मोठा निर्णय

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**नवी दिल्ली** ✍ प्रतिनिधी

केंद्र सरकारने तीनही सैन्यादलांतील शौर्य पुरस्कार विजेते आणि त्यांच्या पात्र कुटुंबीयांसाठी आयुष्यभर मोफत रेल्वे प्रवासाची सुविधा सुरू केली आहे. या लाभांतर्गत प्रथम श्रेणी, द्वितीय एसी आणि एसी चेअर कारमधील प्रवासाचा समावेश असून, हा लाभ त्यांच्या कुटुंबातील काही विशिष्ट श्रेणीतील सदस्यांना मिळणार आहे.

भारताच्या शूर जवानांचा सन्मान करणाऱ्या एका ऐतिहासिक निर्णयात, केंद्र सरकारने भूदल, नौदल आणि वायुसेनेच्या शौर्य पदक विजेत्यांसाठी आयुष्यभर मोफत रेल्वे प्रवासाला मंजुरी दिली आहे. हा लाभ त्यांच्या कुटुंबातील काही विशिष्ट श्रेणीतील सदस्यांपर्यंत देखील वाढवला जाईल. हा निर्णय देशाच्या शूरवीरांसाठी एक मोठा कल्याणकारी निर्णय आहे. अद्भुत शौर्य दाखवणाऱ्यांच्या कुटुंबीयांना सन्मान आणि पाठबळ मिळावे, हा यामागचा उद्देश असल्याचेही केंद्र सरकारने स्पष्ट केले आहे. श्रेणीतील व्यक्ती या मोफत प्रवास सुविधेसाठी सैन्यादलातील सर्व कर्मचारी ज्यांना शौर्य पदकांनी सन्मानित करण्यात आले आहे, मृत पुरस्कार विजेत्याची विधवा किंवा विधुर (पुनर्विवाह करेपर्यंत पात्र), मरणोत्तर पुरस्कार दिला गेला आहे आणि पुरस्कार विजेता अविवाहित होता, तेथे आईवडील या लाभासाठी पात्र असतील. या नवीन



सुविधेअंतर्गत, लाभार्थ्यांना एका सहकाऱ्यासह भारतीय रेल्वेने आयुष्यभर मोफत प्रवास करण्याची परवानगी दिली जाईल. ही सुविधा खालील श्रेणींना लागू होईल. देशातील सन्मानित जवान आणि त्यांच्या कुटुंबीयांना सन्मानजनक आणि आरामदायी प्रवासाचे पर्याय उपलब्ध करून देणे हा या सवलतीचा उद्देश असल्याचे रेल्वे अधिकाऱ्यांनी सांगितले. संरक्षण मंत्रालयाने जाहीर केले आहे की ही योजना तातडीने लागू झाली आहे. या योजनेचा फायदा हजारो लष्करी कुटुंबीयांना होण्याची शक्यता असून, हा उपक्रम जवानांच्या सर्वोच्च त्यागाबद्दल देशाची कृतज्ञता व्यक्त करतो, असा पुनरुच्चार अधिकाऱ्यांनी केला आहे.

भारतातील शौर्य पुरस्कार हे कर्तव्य बजावताना सैन्यादलातील सदस्यांनी दाखवलेले असाधारण शौर्य, कल्पकता आणि त्यागासाठी देशाचा सर्वोच्च सन्मान दर्शवतात. युद्ध, बंडखोरी विरोधी ऑपरेशन्स आणि इतर आव्हानात्मक मोहिमांदरम्यान शौर्याच्या कृत्यांचा सन्मान करण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या या पुरस्कारांमध्ये परमवीर चक्र, महावीर चक्र, वीर चक्र, अशोक चक्र, कीर्ती चक्र आणि शौर्य चक्र यांचा समावेश आहे. हे पुरस्कार केवळ युद्धभूमीवर गाजवलेल्या पराक्रमासाठीच नाही, तर युद्धभूमीबाहेर किंवा प्रत्यक्ष रणसंग्रामापासून दूर दाखवलेल्या असाधारण धैर्यासाठीही दिले जातात.

दैनिक लोकशाही हे पत्र लोकशाही इनोवेशन्स प्रायव्हेट लिमिटेड यांच्या मालकीचे असुन त्यांच्या वतीने मुद्रक, प्रकाशक, संपादिका शांता कमलाकर वाणी, प्रकाशक राजेश कमलाकर यावलकर यांनी लोकशाही इनोवेशन्स प्राइवेट लिमिटेड एम-१८१, एमआयडीसी जळगाव जिल्हा जळगाव ४२५००२ (महाराष्ट्र) येथून छापून लोकशाही,ए-११०४, ब्लुमेन, स्टेशन रोड जवळ, माय बाप रेस्टॉरंट समोर, विक्रोळी पश्चिम, मुंबई ४०००८३ महाराष्ट्र येथे प्रसिद्ध केले. This LOKSHAHI newspaper is owned by Lokshahi Innovations Private Limited and printed on its behalf by Shanta Kamalakar Wani, Printer, Publisher Rajesh kamalakar yawalkar, Editor at Lokshahi Innovations Private Limited M-181, MIDC Jalgaon District Jalgaon 425002 (Maharashtra). Published at LOKSHAHI, A-1104, BLUMEN, NEAR STATION ROAD, OPP. MAAI BAAP RESTAURANT, VIKHROLI (W), MUMBAI, MAHARASHTRA - 400083..PRGI REG NO.MHMAR/26/A7630, EMail- lokshahilive@gmail.com, वर्ष ०१ ले. सहाय्यक संपादक राजेश यावलकर, सल्लागार संपादक धों. ज. गुरव, (पी. आर. बी. कायद्यानुसार) संपादकीय जबाबदारी यांची आहे. जळगाव कार्यालय – २२०, बळीराम पेठ, जळगाव, मो.९४२२७७५०११